जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक २५१ | शुक्रवार, १० एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### २० लाखांच्या कर्जप्रकरणामध्ये दौंडमध्ये वाद

**दौंड, ता. ९ :** न्यायालयाच्या आदेशानुसार जप्त करून सील केलेल्या मालमत्तेचे कुलूप तोडून पुन्हा घरात घुसखोरी केल्याचा धक्कादायक प्रकार दौंड तालुक्यात उघडकीस आला आहे. तब्बल २० लाखांच्या कर्जप्रकरणातून हा वाद पेटला असून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी निखील संपत देवकाते (वय ३०, रा. एम आयडीसी बारामती) यांनी फिर्याद दिली आहे. तर अक्षय माधव काळे, पुष्पा माधव काळे आणि माधव फक्कड काळे (सर्व रा. गुणवरेवस्ती, खडकी, ता. दौंड) यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी सन २०२४ मध्ये चोलामंडलम कंपनीकडून सुमारे २० लाखांचे कर्ज घेतले होते. यासाठी त्यांनी सासवड शाखेकडील मिळकत क्रमांक २०ए मधील सुमारे ५ हजार चौरस फुट जागेवरील ३ हजार चौरस फुट आरसीसी बांधकाम असलेले घर तारण ठेवले होते. मात्र, कर्जाची परतफेड न झाल्याने थकीत रक्कम सुमारे २२.९४ लाखांवर पोहोचली.

# लोणी स्टेशन चौकात वाहतूक पोलीस असल्याचे कळवा अन् रोख रकमेचे बक्षीस मिळवा

## कोंडी सोडवण्यात पोलीस यंत्रणा सपशेल अपयशी

## आधी कोंडी सोडवा, मग दंड करा अशी नागरिकांची मागणी

**लोणी काळभोर, ता. ९ :** पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी इतकी भीषण झाली आहे की, नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होताना दिसत आहे. दररोज तासन्तास वाहनांच्या रांगा, प्रचंड विलंब, धूळ-प्रदूषण आणि मानसिक ताण यांचा सामना करत प्रवासी अक्षरशः हैराण झाले आहेत. मात्र, एवढ्या गंभीर परिस्थितीतही वाहतूक नियंत्रणासाठी जबाबदार असलेली पुणे शहर पोलीस यंत्रणा निष्क्रिय असल्याचे चित्र समोर येत आहे.

दरम्यान, लोणी स्टेशन चौकातील परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. येथे वाहतूक पोलीस क्वचितच कर्तव्य बजावताना दिसतात. त्यामुळे लोणी स्टेशन चौकात पोलीस पूर्णवेळ कर्तव्य बजावत असल्याचे आम्हाला कळवा आणि रोख रकमेचे बक्षीस मिळवा,



अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या चौकात पोलीस कधीही येतात आणि कधीही निघून जातात, त्यामुळे सरकारला अशा प्रकारची योजना राबवावी लागणार नाही ना, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील हडपसर गाडीतळ, मांजरी फार्म, कवडीपाट टोलनाका, लोणी स्टेशन चौक, एमआयटी कॉर्नर, थेऊर फाटा आणि कुंजीरवाडी (नायगाव चौक) या प्रमुख ठिकाणी दररोज प्रचंड वाहतूक कोंडी होत असून वाहनांच्या ३ ते ४ किलोमीटरपर्यंत लांब रांगा लागतात. यामुळे कामावर जाणारे कर्मचारी, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच रुग्णवाहिकांनाही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. आपत्कालीन सेवांवरही याचा गंभीर परिणाम होत असल्याने परिस्थिती अधिकच भयावह बनली आहे. एकीकडे वाहतूक नियंत्रणाचा पूर्ण बोजवारा उडालेला असताना, दुसरीकडे काही ठिकाणी पोलीस कारवाईच्या नावाखाली केवळ पावत्या फाडण्यात आणि वसुलीतच व्यस्त असल्याचे चित्र दिसून येत आहे. दुचाकी व चारचाकी वाहनांवर कारवाई केली जात असली, तरी अवैध वाहतूक तसेच रस्त्यावर अडथळा निर्माण करून थांबणाऱ्या रिक्षांवर मात्र कारवाई होत नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे वाहतूक सुरळीत होण्याऐवजी नागरिकांच्या अडचणींमध्ये अधिक भर पडत आहे.

वाहतूक पोलिसांनी आपली जबाबदारी विसरली आहे का? असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. केवळ कागदी कारवाई आणि दंडात्मक मोहिमा राबवून वाहतूक समस्या सुटणार नाहीत, याची जाणीव प्रशासनाने ठेवणे आवश्यक आहे. आधी कोंडी सोडवा, मग दंड करा, अशी स्पष्ट मागणी नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, वाहतूक पोलीस चौकात नियमितपणे उपस्थित नसल्याने पुणेसोलापूर महामार्गावरील वाहतुकीची पूर्णपणे विस्कळीत अवस्था झाली आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी तत्काळ रस्त्यावर उतरून नियोजनबद्ध पद्धतीने वाहतूक सुरळीत करावी, अन्यथा नागरिकांचा पोलीस यंत्रणेवरील विश्वास पूर्णपणे ढासळू शकतो. प्रशासन आता तरी जागे होणार का, की कोंडी हीच लोणी काळभोरची ओळख बनणार, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे.

### अधिकाऱ्यांची फोन उचलण्यास टाळाटाळ

याबाबत वहातुक कोंडीची समस्याची माहिती घेण्यासाठी पुणे शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव व हडपसर वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांनी फोन न उचलल्याने त्यांची प्रतिक्रिया समजू शकली नाही.

### पोलीस प्रशासनाला जाग येणार का?

लोणी स्टेशन चौकात एक नामांकित इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. ही शाळा दुपारी सुमारे अडीच वाजता सुटते. त्यानंतर विद्यार्थी सोलापूर महामार्ग ओलांडण्यासाठी चौकात येतात. अशावेळी तेथे वाहतूक पोलीस उपस्थित असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, प्रत्यक्षात पोलीस नसल्याने विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे. एखादा मोठा अपघात घडल्यानंतरच पोलीस प्रशासनाला जाग येणार का, असा गंभीर सवाल लोणी काळभोर ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

# रस्ता रोखून वाहतुकीला अडथळा निर्माण केल्याप्रकरणी १७ जणांवर गुन्हा दाखल

## नवीन गार परिसरातील घटना

**दौंड, ता. ९ :** दौंड तालुक्यातील कानगाव ते नवीन गार रस्त्यावर बेकायदेशीर जमाव जमवून सार्वजनिक वाहतुकीला अडथळा निर्माण केल्याप्रकरणी १७ जणांविरुद्ध दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी जमावाला पांगण्याचा आदेश देऊनही आंदोलकांनी आपले कृत्य सुरूच ठेवल्याने ही कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये महिलांचाही मोठ्या प्रमाणावर समावेश आहे.




आकाश दिलीप पायगुडे, अजय रावसाहेब जाधव, विशाल दादा चौरे, बाळासाहेब शामराव विटकर, बापू पांडुरंग येडे, कमरुद्दीन इस्माईल शेख, दत्ता माणी पाडोळे, लता दिलीप येडे, सुरेखा विलास येडे, वच्छला बाबुराव चौरे, द्रोपदा हरीभाऊ वायसे, कमल बापू येडे, चांगुणा नागनाथ येडे, आणि सार्थक महादेव चौरे (सर्व रा. येडेवस्ती, नवीन गार, ता. दौंड) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस शिपाई प्रविण किसन राऊत यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ ते रात्री ९ वाजण्याच्या सुमारास येडेवस्ती (नवीन गार) येथील रस्त्यावर हा प्रकार घडला. आकाश दिलीप पायगुडे याने अन्य १६ जणांना एकत्र करून बेकायदेशीर जमाव जमवला. या जमावाने रस्त्यावर ठाण मांडल्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली होती आणि येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना अडवून धरण्यात आले होते.

घटनेची माहिती मिळताच दौंड पोलीस स्टेशनचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी जमावाला रस्ता मोकळा करण्याच्या आणि पांगण्याच्या सूचना वारंवार दिल्या. मात्र, आंदोलकांनी पोलिसांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून आपले आंदोलन आणि बेकायदेशीर कृत्य सुरूच ठेवले. दरम्यान, दौंड पोलिसांनी या सर्वांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस हवालदार बोराडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# बंगालमध्ये सत्तापरिवर्तन अटळ; पंतप्रधान मोदी यांची ममता बॅनर्जींवर टीका

**पश्चिम बंगाल, ता. ९ :** पश्चिम बंगालमधील राजकीय वातावरण तापले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी सत्ताधारी तृणमूल काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. राज्यात सत्तापरिवर्तन आता अटळ असून तृणमूल काँग्रेसच्या पापांचा घडा पूर्णपणे भरला आहे, अशा शब्दांत त्यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर कडाडून टीका केली.

आसनसोल या औद्योगिक आणि कोळसा पट्ट्यात आयोजित प्रचार सभेत पंतप्रधान बोलत होते. बंगालच्या ढासळत्या आर्थिक स्थितीवर बोट ठेवताना ते म्हणाले की, एकेकाळी देशाच्या एकूण सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) १२ टक्के वाटा उचलणाऱ्या बंगालचे योगदान आता केवळ ५ टक्क्यांवर




येऊन ठेपले आहे. ही आर्थिक घसरण राज्याच्या अधोगतीचे लक्षण असल्याचे त्यांनी नमूद केले.

आसनसोलमधील स्थानिक प्रश्नांना हात घालताना पंतप्रधानांनी सिंडिकेट राजवर प्रहार केला. संपूर्ण आसनसोल कोळसा आणि वाळू माफियांनी वेढले आहे. इथल्या एकेकाळच्या वैभवशाली उद्योगांनी पलायन केले असून, गुंतवणूकदार पाठ फिरवत आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी भाजपचे डबल इंजिन सरकारच आवश्यक आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्राने या भागातील उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी ४५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती, परंतु राज्य सरकारच्या अडवणुकीमुळे प्रगतीला खीळ बसल्याचा आरोपही त्यांनी केला. महिला सुरक्षेच्या मुद्द्यावरूनही मोदींनी तृणमूल काँग्रेसला धारेवर धरले. बंगालमध्ये सिड हल्ल्याच्या घटनांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचा दावा करत त्यांनी सत्ताधारी पक्ष महिलांवर अत्याचार करणाऱ्यांच्या पाठीशी उभा राहत असल्याची टीका केली.

दरम्यान, केवळ भाजपच बंगालमधील महिलांना सुरक्षित वातावरण देऊ शकते, असे आश्वासन त्यांनी दिले. आसनसोल आणि दुर्गापूरमध्ये मेगासिटी बनण्याची प्रचंड क्षमता असून भाजप सत्तेत आल्यास या शहरांचा चेहरामोहरा बदलला जाईल, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.



# पार्थ पवारांची अजितदादा स्टाईल एन्ट्री; गुलाबी जॅकेटमध्ये घेतली शपथ

**नवी दिल्ली, ता. ९ :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी गुरुवारी (ता. ९) राज्यसभेची खासदारकीची शपथ घेतली. याद्वारे आता पवार कुटुंबातील आणखी एक पिढी राष्ट्रीय पातळीवर काम करणार आहे. संसद भवनातील अध्यक्षीय परिषद कक्षात, हा शपथविधी सोहळा राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष तथा उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल देखील पार्थ पवारांसोबत उपस्थित होते.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) अध्यक्ष रामदास आठवले यांच्यासह एकूण १९ नवनिर्वाचित सदस्यांनी ६ एप्रिल २०२६ रोजी आपल्या खासदारकीची अधिकृत शपथ ग्रहण केली. प्रकृतीच्या कारणास्तव शरद पवार यांनी व्हीलचेअरवरून सभागृहात प्रवेश केली आणि त्याच स्थितीत खासदारकीची शपथ घेतली. वयाची ऐंशी ओलांडल्यानंतरही आणि शारीरिक मर्यादा असतानाही, लोकशाहीच्या कर्तव्याप्रती असलेली त्यांची ही निष्ठा पाहून सभागृहातील उपस्थित थक्क झाले. तर दुसरीकडे पार्थ पवार यांनी देखील खासदारकीची अधिकृतरित्या शपथ घेतल्याने आता आजोबा आणि नातू एकत्र राज्यसभेवर कामकाज पाहणार आहेत.

# कदमवाकवस्ती येथील भाजी विक्रेत्याची मुलगी बनली पोलीस; जिद्दीच्या जोरावर मोनाली जाधवची यशोगाथा

**लोणी काळभोर, ता. ०९ :** अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही स्वप्नांचा पाठलाग करत यशाचे शिखर गाठता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील मोनाली गोविंद जाधव. भाजी विक्री करणारे वडील आणि शेतमजुरी करणारी आई अशा साध्या कुटुंबातून आलेल्या मोनालीने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर पुणे शहर पोलीस दलात कॉन्स्टेबल पद मिळवत कुटुंबाचे स्वप्न साकार केले आहे.

राजगृह कॉलनीतील अवघ्या दहा बाय दहाच्या भाड्याच्या खोलीत मोनालीचे कुटुंब वास्तव्यास आहे. आर्थिक परिस्थिती नाजूक असतानाही तिच्या आई-वडिलांनी मुलीच्या शिक्षणात कधीही खंड पडू दिला नाही. वडील गोविंद जाधव दिवस-रात्र कष्ट करून भाजी विक्रीचा व्यवसाय करत कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई रेखा जाधव शेतात मजुरी करून संसाराला हातभार लावतात. अशा संघर्षमय वातावरणात वाढलेल्या मोनालीने लहानपणापासूनच पोलीस व्हायचे हे स्वप्न मनाशी बाळगले होते.

मोनाली चे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण लोणी काळभोरमध्येच झाले. सध्या ती हडपसर येथील एस.एम. जोशी विद्यालयात कला शाखेच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत आहे. सुरुवातीला पोलीस भरती प्रक्रियेबद्दल तिला फारशी माहिती नव्हती. मात्र महाविद्यालयातील मित्रमैत्रिणींच्या मार्गदर्शनातून तिने या क्षेत्राची माहिती घेतली आणि त्यासाठी ठामपणे तयारी सुरू केली. आई-



वडिलांचा भक्कम पाठिंबा मिळाल्यानंतर मोनालीने प्रशिक्षणासाठी श्री अॅकॅडमीत प्रवेश घेतला. सकाळी लवकर उठून धावणे, व्यायाम, शारीरिक कसरती आणि दिवसभर अभ्यास असा तिचा कठोर दिनक्रम सुरू झाला. घरची जबाबदारी सांभाळत आणि शिक्षण सुरू ठेवत तिने कोणतीही तडजोड न करता स्वतःला पूर्णपणे तयारीत झोकून दिले. या मेहनतीचे फळ तिला पुणे शहर पोलीस भरती प्रक्रियेत मिळाले. शारीरिक क्षमता चाचणीत तिने ५० पैकी ४७ गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली, तर लेखी परीक्षेत १०० पैकी ७९ गुण मिळवले. एकूण १२६ गुणांसह खुल्या प्रवर्गातील १२५ गुणांच्या मेरिटमध्ये स्थान मिळवत तिने पोलीस कॉन्स्टेबल पदावर आपली निवड निश्चित केली. मुलगी पोलीस झाली, ही आनंदाची बातमी कळताच आई-वडिलांचा आनंद गगनात मावेनासा झाला. वर्षानुवर्षे कष्ट करून मुलीला उभे करण्याचे स्वप्न अखेर साकार झाल्याने त्यांच्या डोळ्यांत अभिमानाचे अश्रू तरळले.

मोनाली जाधवची ही यशोगाथा केवळ तिच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. तिच्या जिद्दीने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी इच्छाशक्ती आणि मेहनत असेल, तर कोणतेही स्वप्न अशक्य नाही. मोनालीच्या यशामुळे कदमवाकवस्ती परिसरातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. साध्या कुटुंबातून येऊन मोठे यश मिळवणाऱ्या मोनालीने अनेक तरुण-तरुणींना प्रेरणा दिली आहे.

> माझ्या यशामागे माझ्या आई-वडिलांचे मोठे योगदान आहे. त्यांनी खूप कष्ट केले, त्याग केला. कोणतेही स्वप्न पूर्ण करायचे असेल तर त्यासाठी सातत्याने मेहनत आणि चिकाटी आवश्यक असते. अपयश आले तरी हार मानू नका. प्रामाणिक प्रयत्न करत राहिलात, तर यश नक्की मिळते.
>
> - **मोनाली गोविंद जाधव**



# डाक विभागाचा झेंडा राष्ट्रीय पातळीवर फडकला!

## पुण्याच्या खेळाडूंनी पटकावली सुवर्ण-रौप्य पदके

**पुणे, ता. ९ :** भारतीय डाक विभागाच्या रेल्वे डाक सेवा ब मंडळ, पुणे येथील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर दिमाखदार कामगिरी करत विभागाचा मान उंचावला आहे. अखिल भारतीय नागरी सेवा वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग आणि खो-खो स्पर्धांमध्ये पुण्याच्या खेळाडूंनी चमकदार यश संपादन करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

वेटलिफ्टिंग स्पर्धेत तृप्ती माने (एम.टी.एस., आर.एम.एस. ब मंडळ, पुणे) यांनी दमदार कामगिरी करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. त्यांनी स्नॅच प्रकारात ५५ किलो आणि क्लीन अॅण्ड जर्कमध्ये ७५ किलो असे एकूण १३० किलो वजन उचलत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले. त्यांच्या या ताकदवान आणि तांत्रिक खेळीने उपस्थितांकडून जोरदार दाद मिळाली.

खो-खो स्पर्धेत विक्रम पाटील (सॉर्टिंग असिस्टंट, आर.एम.एस. ब मंडळ, पुणे) यांनीही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रौप्यपदक मिळवले. त्यांच्या चपळाई, वेग आणि संघभावनेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. पुण्याच्या या यशस्वी खेळाडूंमुळे भारतीय डाक विभागाचा क्रीडा क्षेत्रातील दबदबा पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

दरम्यान, या यशामागे खेळाडूंची जिद्द, कठोर परिश्रम, शिस्तबद्ध सराव आणि प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन असल्याचे अधोरेखित झाले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल आर.एम.एस. ब विभागाचे अधीक्षक बाळकृष्ण एरंडे यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# राहुरीत शेवटच्या दिवशी अनेक उमेदवारांची माघार; तरीही सात उमेदवार रिंगणात

**अहिल्यानगर, ता. ९ :** राज्यातील विधानसभा पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडल्या. बारामतीमध्ये काँग्रेसने अखेरच्या क्षणी माघार घेतल्याने तेथील उत्सुकता काहीशी कमी झाली असली, तरी राहुरी मतदारसंघात मात्र लढत अधिक रंगतदार बनली आहे. येथे अनेक उमेदवारांनी माघार घेतल्यानंतर अखेर ७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात कायम राहिले आहेत.

राहुरीचे दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी ही पोटनिवडणूक होत आहे. भाजप महायुतीने त्यांचे सुपुत्र अक्षय कर्डीले यांना उमेदवारी दिली आहे. सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडून प्राजक्त तनपुरे यांचे नाव चर्चेत होते; मात्र त्यांनी ऐनवेळी माघार घेतल्याने पक्षाने गोविंद मोकाटे यांना उमेदवारी दिली.

भाजपकडून ही निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न झाले होते. मात्र, सात उमेदवार कायम राहिल्याने आता मतदान होणार हे स्पष्ट झाले आहे. प्रमुख लढत भाजपचे अक्षय कर्डीले आणि राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे गोविंद मोकाटे यांच्यात होण्याची शक्यता आहे. याशिवाय वंचित बहुजन आघाडीकडून संतोष चोळके रिंगणात आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे यांनी



अपक्ष म्हणून उमेदवारी कायम ठेवत बंडखोरीचा झेंडा उंचावला आहे.

**रिंगणातील उमेदवार**

अक्षय कर्डीले - भाजप महायुती, गोविंद मोकाटे- राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार), संतोष चोळके- वंचित बहुजन आघाडी, अथर्व म्हसे, रावसाहेब खेवरे, सूर्यभान लांबे, महेश हापसे.

**बारामतीत २३ उमेदवार रिंगणात कायम**

राहुरी सोबतच बारामती विधानसभा मतदार संघातही अजित पवार यांच्या निधनानंतर पोटनिवडणुक होत आहे. येथे बारामतीत एकूण ५३ उमेदवारांचे अर्ज होते. यापैकी ३० उमेदवारांनी माघार घेतली असली तरी अद्याप २३ उमेदवार हे रिंगणात कायम आहेत. त्यामुळे बारामतीत बिनविरोध निवडणूक होणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. मात्र आता काँग्रेस पक्षाच्या माघारीमुळे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा विजयाचा मार्ग अधिक सुखकर झाला आहे. माघारीनंतरचे चित्र स्पष्ट झाल्याने आता राहुरीत कोण बाजी मारणार याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे. या पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिलला मतदान होणार असून ४ मे रोजी निकाल जाहीर होणार आहेत.

## यवत पोलिसांचा गावठी हातभट्टी चालकावर छापा

**यवत, ता. ९ :** यवत पोलिस स्टेशन हद्दीतील नाथाचीवाडी गावच्या जवळ रायकर वस्ती येथील मटोबा तलावाच्या कडेला दि.७ रोजी गावठी हातभट्टी तयार करण्यात येत असलेल्या ठिकाणी यवत पोलिसांनी छापा टाकला असून यावेळी गावठी हातभट्टी तयार करण्यासाठी लागणारे ५०० लिटर कच्चे रसायन, ३५ लिटर तयार गावठी हातभट्टी व इतर साहित्य असा एकूण २३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून यावेळी गावठी दारू गाळण्याची भट्टी चालवीत असलेला चेतन लक्ष्मण गुडदावत (रा. नाथाचीवाडी ,ता. दौंड, जि.पुणे) हा पोलिसांची चाहूल लागताच पळून गेला असून त्याच्या विरोधात यवत पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत पुढील तपास पोलिस हवालदार खोमणे हे करत आहेत.

# उरुळी कांचनमध्ये अनधिकृत 'होर्डिंग' कोसळले; पीएमआरडीएकडून मालकावर गुन्हा दाखल

**उरुळी कांचन, ता. ९ :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला सुरक्षिततेचे नियम धाब्यावर बसवून उभारलेले एक मोठे होर्डिंग वादळी वाऱ्यामुळे कोसळल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (झचठऊ) च्या वतीने एकावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

'संस्कृती अँड कंपनी'चे मालक शिवाजी जाधव (पूर्ण नाव माहित नाही) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी प्राधिकरणाचे शाखा अभियंता संक्त बाबासाहेब बडे (वय ३१, रा. कोथरुड ता. हवेली) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उरुळी कांचन (ता. हवेली) येथील गट नं. ३५४ मध्ये महामार्गाच्या कडेला शिवाजी जाधव यांनी कोणत्याही शासकीय परवानगीशिवाय 'संस्कृती अँड कंपनी'चे होर्डिंग उभारले होते. ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास परिसरात सोसाट्याचा वारा आणि पाऊस झाल्याने हे अनधिकृत होर्डिंग अचानक कोसळले. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र यामुळे लोकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला.

या घटनेनंतर पीएमआरडीए प्रशासनाने तातडीने कारवाईची पावले उचलली. प्राधिकरणाचे शाखा अभियंता संक्त बडे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, आरोपीने लोकांच्या जिवितास आणि सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अशा अत्यंत धोकादायक पद्धतीने हे होर्डिंग लावले होते. दरम्यान, प्रशासनाच्या तक्रारीवरून आरोपी शिवाजी जाधव यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १२५, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ (२), नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अमेरिका-इराण तणाव निवळताच सोन्या-चांदीच्या दरामध्ये घसरण

**जळगाव, ता. ९ :** जागतिक राजकारणातील घडामोडींचा थेट परिणाम सोन्या-चांदीच्या दरावर कसा होतो, याचा अनुभव सध्या भारतीय सराफा बाजारात येत आहे. बुधवारी अमेरिका आणि इराणमध्ये शस्त्रसंधी घोषित होताच सोन्या-चांदीने जी गगनभरारी घेतली होती, ती केवळ २४ तासांतच जमिनीवर आली आहे. जळगावमध्ये सोन्याच्या दरात २,१०० रुपयांची, तर चांदीच्या दरात तब्बल ७,००० रुपयांची मोठी घसरण नोंदवण्यात आली आहे.

बुधवारी अमेरिका आणि इराणमधील तणाव निवळून शांततेचे संकेत मिळताच बाजारात अनपेक्षित तेजी आली होती. अवघ्या काही तासांत सोन्यात ३,००० आणि चांदीमध्ये १०,००० रुपयांची वाढ झाली. मात्र, ही तेजी कमीवेळ टिकली.


सराफा बाजारातील तज्ज्ञांच्या



मते, जेव्हा जेव्हा डॉलर वधारतो, तेव्हा सोन्याच्या मागणीवर परिणाम होतो आणि किमती खाली येतात. अमेरिका-इराणमधील शस्त्रसंधी मुळे युद्धाचे सावट दूर झाल्याने गुंतवणूकदारांनी सोन्यातील गुंतवणूक काढून इतर पर्यायांकडे वळवण्यास सुरुवात केली आहे, हेच या घसरणीचे मुख्य कारण आहे. जीएसटीसह सोन्याचा भाव १,५३,९८५ रुपये प्रति तोळा (१० ग्रॅम) इतका आहे. तर, चांदीचा दर २,४७,२०० रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे.

# यवत येथील सुप्रसिद्ध डॉ. श्याम कुलकर्णी यांचे निधन

**राहुलकुमार अवचट**



यवत, ता. ०९ : यवत येथील प्रसिद्ध व सेवाभावी वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व डॉ. श्याम कोंडदेव कुलकर्णी यांचे बुधवारी (ता. ०८) सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मित निधन झाले. गरीब, गरजू व अपघातग्रस्त रुग्णांसाठी देवदूत म्हणून ओळख असलेले डॉ. कुलकर्णी यांनी तब्बल ५५ वर्षांहून अधिक काळ यवत परिसरात निस्वार्थ रुग्णसेवा केली.

सातारा जिल्ह्यातील वाई येथून १९८० च्या दशकात यवत येथे येऊन त्यांनी आपले वैद्यकीय कार्य सुरू केले. अत्यल्प शुल्कात, आणि अनेकदा विनामूल्य उपचार देत त्यांनी हजारो रुग्णांना जीवदान दिले. पुणेसोलापूर महामार्गावरील पाटस ते उरुळी दरम्यान अपघात झाल्यास जखमींना तात्काळ त्यांच्या आनंद हॉस्पिटलमध्ये आणले जात असे. आधी जीव वाचवा, नंतर कायदेशीर प्रक्रिया हा त्यांचा मूलमंत्र होता.

दौंड येथील पिरॅमिड हॉस्पिटल व यवत येथील आनंद हॉस्पिटल च्या माध्यमातून त्यांनी अनेक वर्ष रुग्णसेवा केली. सेवाभावी वृत्तीने रुग्ण सेवेला वाहून घेतलेले, सामाजिक भान असणारे, सर्वांना सढळ हाताने मदत करणारे तसेच राजकीय, सामाजिक व धार्मिक यासर्व क्षेत्रात त्यांचे कायमच योगदान होते. अनेक अपघातग्रस्तांसाठी देवदूत असलेले हे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेल्याने यवत परिसरात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. त्यांच्या कार्यामुळे त्यांना गरीबांचे डॉक्टर म्हणून ख्याती मिळाली. दरम्यान, पश्चात पत्नी, मुलगा डॉ. समीर कुलकर्णी, सुना, नाती असा मोठा परिवार आहे. डॉ. श्याम कुलकर्णी यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. दशक्रिया विधी गुरुवार १६ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजता यवत येथील श्री काळभैरवनाथ मंदिर शेजारी होणार आहे.

# शिरूरमध्ये एमडी ड्रग्जसह २ जण ताब्यात; १ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**शिरूर, ता. ९ :** पुणे जिल्ह्यातील शिरूर परिसरात दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) मोठी कारवाई करत मॅफेड्रॉन (एमडी) या अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या २ तरुणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत सुमारे १,०४,००० रुपये किमतीचा ड्रग्ज साठा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई ७ मार्च रोजी करण्यात आली.

रांजणगाव एमआयडीसी आणि शिरूर परिसरात एमडीसारख्या घातक ड्रग्जमुळे अनेक तरुण व्यसनाधीन होत असल्याची माहिती समोर आल्यानंतर पोलिसांनी याची गंभीर दखल घेतली. पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या आदेशानुसार एटीएस पथकाने गुप्त माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान शिरूर हद्दीत पुणे-अहिल्यानगर महामार्गाजवळील एम्पायर नावाच्या पान टपरीवर एक तरुण



एमडी ड्रग्ज विकत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार एटीएस पथकाने शिरूर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांसह साध्या वेशात छापा टाकला. या कारवाईत साहील संदीप करंजुले (वय २०, रा. पाडळी, रांजणगाव, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) आणि ओंकार संजय धावडे (वय २३, रा. रामलिंग रोड, शिरूर, जि. पुणे) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून विक्रीसाठी ठेवलेला एमडी ड्रग्ज साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये अमली पदार्थ कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना पुढील कारवाईसाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. न्यायालयात हजर केले असता त्यांना ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महेश गायकवाड, विशाल गव्हाणे, पोलीस हवालदार निलेश कदम, रवींद्र जाधव, मोसीन शेख, ओंकार शिंदे, जालिंदर मुळीक तसेच शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक हनुमंत नकाते, पोलीस हवालदार नितीन सुद्रीक, राहुल भवर आणि पवन तायडे यांचा समावेश होता. आरोपींकडील अमली पदार्थ कुठून आणले गेले आणि यामागे कोणते मोठे रॅकेट आहे याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हनुमंत नकाते करत आहेत.

# संतोष देशमुखांच्या निधनानंतर मस्साजोगमध्ये गावाची बिनविरोधची अपेक्षा

## पण निवडणुकीत चुरस वाढली; दोन उमेदवारांमध्ये लढत

**बीड, ता. ९ :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावात सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीला अनपेक्षित वळण मिळाले आहे. दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या पदासाठी ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी गावकऱ्यांची आणि कुटुंबीयांची अपेक्षा होती. मात्र अखेर या निवडणुकीत स्पर्धा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दिवंगत सरपंचांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचे नाव कुटुंबीय आणि ग्रामस्थांच्या चर्चेनंतर पुढे आले. त्या ९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज दाखल करत आहेत. संतोष देशमुख यांनी सुरू केलेली विकासाची कामे पुढे नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. पुढील १८ महिन्यांच्या कालावधीत गावातील



पाणीटंचाई, मूलभूत सुविधा आणि प्रलंबित कामांवर लक्ष केंद्रित करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र या पार्श्वभूमीवर स्वरूपानंद देशमुख यांनीही निवडणुकीत उतरण्याची घोषणा केली आहे. ते दुपारी १ ते ३ या वेळेत अर्ज दाखल करणार आहेत. गावात एकूण २२८४ मतदार असून, गावाने बिनविरोध निर्णय घेतला तर स्वागत आहे, अन्यथा निकाल २९ तारखेला दिसेल, असे त्यांनी सांगत स्पर्धेची शक्यता अधोरेखित केली.

या निवडणुकीचा संदर्भ केवळ सत्तांतरापुरता मर्यादित नाही. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर गावात निर्माण झालेली भावनिक पोकळी आणि न्यायासाठी सुरू असलेला संघर्ष यामुळे ही निवडणूक अधिक संवेदनशील बनली आहे. गावात एकात्मता टिकवून विकासाचा मार्ग निवडायचा की लोकशाही पद्धतीने स्पर्धा करायची, हा प्रश्न आता ग्रामस्थांसमोर आहे.

# सुनेत्रा पवारांच्या विनंतीला मान दिला; बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार

**पुणे, ता. ०९ :** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सोमवारी जोरदार शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महायुतीतील दिग्गज नेत्यांची उपस्थिती पाहायला मिळाली. महायुतीतील प्रमुख नेत्यांनी उपस्थित राहून पवार यांच्या उमेदवारीला बळ अन् पाठिंबा दिला. तसेच लक्ष्मण हाके यांनी माघार घेत सुनेत्रा पवार यांना पाठिंबा दिला.



परंतु करुणा मुंडे, काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे हे सुद्धा रिंगणात उतरले होते. अखेर सुनेत्रा पवार यांच्या विनंतीला मान देत काँग्रेसने बारामती पोटनिवडणुकीतून माघार घेतल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभेची जागा रिक्त जागा झाली होती. त्यानंतर याठिकाणी पोटनिवडणूक जाहीर झाली. अजितदादांवरील बारामतीकरांचे प्रेम पाहता ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे भाजप आणि शरद पवार पक्षाने याठिकाणी उमेदवार न देण्याचे जाहीर केले. परंतु काँग्रेसने बारामती पोटनिवडणुकीसाठी आकाश मोरे उमेदवार दिला होता.

ही निवडणूक बिनविरोध होणार नसल्याचे स्पष्ट झाले. मात्र सुनेत्रा पवार यांनी हर्षवर्धन सपकाळ यांना फोन करून माघार घेण्याची विनंती केल्याची माहिती सपकाळ यांनी दिली. अखेर माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसने पोटनिवडणुकीतून माघार घेतली आहे. आता बारामती विधानसभेत अजित पवारांच्या जागेवर सुनेत्रा पवार यांचा नावाचा शिक्कामोर्तब झाला आहे.

# शिरूरमध्ये एटीएसची धडक कारवाई; गावठी पिस्टलसह दोघे जेरबंद; मोठा कट उधळला?

**शिरूर, ता. ९ :** पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) शिरूर परिसरात धाडसी कारवाई करत गावठी पिस्टलसह दोन सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेत मोठा अनर्थ टळला आहे. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या आदेशानुसार अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत होती. त्याच अनुषंगाने एटीएस पथक शिरूर परिसरात माहिती गोळा करत असताना, सतरा कमान रोड परिसरात एका इसमाकडे गावठी पिस्टल असल्याची खात्रीशीर



माहिती मिळाली.

त्यानुसार शिरूर पोलीस स्टेशनच्या मदतीने पांजरपोळ समोर सापळा रचून छापा टाकण्यात आला. या कारवाईत सुमित वसंत शेळके (वय २०, रा. पळवे खुर्द, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) आणि साजिद रफिक खान (वय ३०, रा. मंगलमूर्ती नगर, शिरूर) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून सुमारे ५० हजार रुपये किमतीचे बेकायदेशीर गावठी पिस्टल जप्त करण्यात आले.

तपासादरम्यान, हे पिस्टल साजिद खान याने सुमित शेळके याला विक्री केल्याचे उघड झाले आहे. दोन्ही आरोपी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, याआधीही त्यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, एक वर्षापूर्वी अहिल्यानगर येथील सुपा एमआयडीसी परिसरात ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रक्टच्या वादातून खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हाही त्यांच्यावर दाखल आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. न्यायालयाने दोन्ही आरोपींना ६ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, हे पिस्टल नेमके कोणत्या हेतूने आणले होते, याचा सखोल तपास सुरू आहे.

सदर कामगिरी दहशतवाद विरोधी शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महेश गायकवाड, विशाल गव्हाणे, पोलीस हवालदार निलेश कदम, रवींद्र जाधव, मोसीन शेख, ओंकार शिंदे, जालिंदर मुळीक, तसेच शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, नीरज पिसाळ यांचे पथकांने केलेली आहे.

# पुण्यात महिला प्राचार्याला ब्लॅकमेल करून ७ लाख उकळले

## रील स्टार सोनाली हिंगेसहित २ पोलिसांवर गुन्हा दाखल

**पुणे, ता. ९ :** एका नामांकित संस्थेच्या महिला प्राचार्याला ब्लॅकमेल करून ७ लाख रुपये उकळल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षकासह तीन पोलीस कर्मचाऱ्यांविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजित बडे, सोनाली हिंगे, सुदाम तायडे अशी संशयित आरोपींची नावे आहेत. सोनाली हिंगे या रील स्टार असल्याची मिळत आहे.



विशेष म्हणजे दामिनी पथकाशी संबंधित असलेल्या महिला कर्मचाऱ्याचे नाव या प्रकरणात आल्याने प्रकरण अधिक संवेदनशील बनले आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत ही मोठी कारवाई केली आहे. सोनाली हिंगे या पोलीस दामिनी मार्शल असून शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असून त्या प्रसिद्ध रील स्टार देखील आहेत. तसेच सुदाम तायडे यांची शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे नेमणूक करण्यात आली आहे.

या गंभीर प्रकरणात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेली आणि सोशल मीडियावर 'रील स्टार' म्हणून प्रसिद्ध असलेली महिला पोलीस कर्मचारी सोनाली हिंगे हिचा समावेश असल्याने चर्चांना उधाण आले आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे ही तक्रार प्राप्त होताच, त्यांनी या प्रकरणाबाबत तत्काळ चौकशीचे आदेश दिले. तसेच प्राथमिक चौकशीत पोलिसांचा सहभाग स्पष्ट झाल्यानंतर पोलीस आयुक्तांनी कडक भूमिका घेत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या अवमानप्रकरणी सीईटी सेल कडून माफीनामा सादर

## संबंधितांवर कारवाई करण्याची ग्वाही : आमदार राहुल कुल यांची माहिती

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ९ : एलएलबी अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करून सीईटी सेलकडून शिवरायांचा अपमान झाल्याची गंभीर बाब आमदार राहुल कुल यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षेचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांच्या निदर्शनास आणून दिली होती. सिटी सेलने याची गंभीर दखल घेतली असून झालेल्या चुकीबाबत दिलगिरी व्यक्त करत माफीनामा सादर केला असल्याची माहिती दौंडचे आमदार राहुल कुल यांनी दिली.

दिनांक १ व २ एप्रिल २०२६ रोजी ३ वर्षीय एलएलबी अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ऑनलाइन पद्धतीने एकूण ४ सत्रांमध्ये घेण्यात आली. या सर्व सत्रांसाठी वापरण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेमध्ये इंग्रजी भाषेसोबत अनुवादित मराठी भाषेमधील आवृत्ती पुरविण्यात आलेली होती त्यापैकी एका सत्रासाठी वापरण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेमधील सामान्यज्ञान विभागाच्या मराठी अनुवादित आवृत्तीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंत्रिमंडळाचे नाव काय होते, अशा आशयाच्या प्रश्नामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा एकेरी उल्लेख झाल्याचे



निदर्शनास आलेले असल्यामुळे संबंधित जबाबदार व्यक्तींवर कारवाई करावी, अशा प्रकारची मागणी आमदार राहुल कुल यांनी केली होती.


याबाबत राज्य सामाईक प्रवेश परीक्षेचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांच्याकडून आमदार राहुल कुल यांना पाठवलेल्या पत्रात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा मार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षांचे गोपनीय काम काज तज्ज्ञांमार्फत करून घेतले जाते. गोपनीयता राखण्याच्या दृष्टीने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामधील कोणताही अधिकारी अथवा कर्मचारी या सर्व गोपनीय कामकाजामध्ये प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभागी नसतो. या सर्व प्रक्रियेची सर्वोच्च पातळीची गोपनीयता राखण्याच्या दृष्टीने या प्रक्रियेमध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचा सहभाग हा फक्त सर्व तज्ज्ञांना गोपनीय कामकाजासाठी आवश्यक असलेली यंत्रणा उपलब्ध करून देणे या पुरता मर्यादित ठेवण्यात आलेला आहे.

प्रश्न तयार करताना अथवा अनुवादित आवृत्तीचे परीक्षण करताना संबंधित तज्ज्ञांकडून अनवधानाने ही चूक झाल्याची शक्यता असावी. तथापि, या चुकीचे समर्थन न करता, झालेल्या चुकीबद्दल सीईटी कक्ष दिलगिरी व्यक्त करीत आहे व माफीनामा सादर करीत आहे व ज्यांचेकडून चूक झाली त्यांचेवर देखील कारवाई करण्यात येईल अशी ग्वाही दिली आहे. याबाबत आमदार राहुल कुल यांनी समाधान व्यक्त केले असून संबंधितांनी तात्काळ कार्यवाही केल्याबद्दल आभार व्यक्त केले.

# इस्त्रायलचा लेबनॉनवर भीषण हवाई हल्ला; ५० फायटर जेट्स, १६० बॉम्ब अन् १०० हून अधिक ठार

**मुंबई, ता. ९ :** अमेरिका, इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या भीषण युद्धाला ४० दिवसांनंतर अखेर तात्पुरता विराम मिळाला आहे. बुधवारी दोन्ही देशांनी दोन आठवड्यांच्या युद्धविरामाला मान्यता दिली. या काळात अमेरिका आणि इराण यांच्यात चर्चा होणार आहे. तसेच इराणने स्ट्रीट ऑफ होर्मूज खुला करण्यासही सहमती दर्शवली आहे. या युद्धविरामासाठी पाकिस्तानने मध्यस्थी केल्याची माहिती समोर आली आहे.

मात्र युद्धविराम लागू होऊन २४ तासही झाले नाहीत, तोच परिस्थिती पुन्हा तणावपूर्ण झाली आहे. पाकिस्तानने सुचवलेल्या प्रस्तावात इस्त्रायलने लेबनॉनवर हल्ले थांबवावेत, अशी अट होती.



पण इस्त्रायलने ही अट मान्य केली नाही. आमचा युद्धविराम हा फक्त इराणसोबत आहे, लेबनॉनवर कारवाई सुरूच राहील, असे इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी स्पष्ट केले होते.

युद्धविरामानंतर लगेचच इस्त्रायलने लेबनॉनवर मोठा हल्ला केला. सुमारे ५० फायटर जेटच्या मदतीने हा हल्ला करण्यात आला. यात जवळपास १६० बॉम्ब टाकण्यात आले. हिज्बुल्लाहच्या ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले असल्याचे सांगितले जात आहे. या हल्ल्यात १०० पेक्षा जास्त हिज्बुल्लाह सदस्य मारले गेल्याची माहिती आहे. तसेच अनेक सामान्य नागरिकांचाही मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. अनेक जण जखमी झाले असून मोठे नुकसान झाले आहे.


दरम्यान, या हल्ल्यानंतर लेबनॉनचे पंतप्रधान नवाफ सलाम यांनी इतर देशांकडे मदतीची मागणी केली आहे. युद्धविरामाचे स्वागत असले तरी आमच्यावर हल्ले सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे. इराणनेही लेबनॉनवरील हल्ले तात्काळ थांबवण्याची मागणी केली आहे. तसे न झाल्यास युद्धविराम मोडण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा या संघर्षाची तीव्रता वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# लोणी काळभोर येथील भरती प्रक्रियेत ऑन ड्युटी 'नशा' पडली महागात

## पुणे पोलीस दलातील हवालदार तडकाफडकी निलंबित

**लोणी काळभोर, ता. ९ :** पोलीस दलाची प्रतिमा मलीन करणाऱ्या आणि संवेदनशील कर्तव्यावर असताना मद्यप्राशन करून गैरवर्तन करणाऱ्या दोन पोलीस हवालदारांना शासकीय सेवेतून तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी निलंबनाचे आदेश दिले. सचिन सुरेशराव जाधव आणि संजय अंकुश कराड अशी निलंबन करण्यात आलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

पहिली घटना २१ मार्च रोजी लोणी काळभोर येथील एमआयटी (एडीटी) विद्यापीठात घडली. पुणे शहर पोलीस भरती २०२४-२५ ची लेखी परीक्षा सुरू असताना हवालदार सचिन जाधव यांची नियुक्ती संवेदनशील अशा इमारत क्र.१ च्या बंदोबस्तासाठी करण्यात




आली होती. सायंकाळी वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी पाहणी केली असता, जाधव हे मद्याच्या नशेत आढळले. ससून रुग्णालयातील वैद्यकीय तपासणीत त्यांनी मद्यपान केल्याचे निष्पन्न झाले. अत्यंत महत्त्वाच्या शासकीय प्रक्रियेत असा बेजबाबदारपणा दाखवल्याने त्यांच्यावर निलंबनाची कुऱ्हाड कोसळली आहे. दुसरी घटना दुसरी घटना ९ मार्च रोजी घडली. उंड्री पोलीस चौकीत ड्युटी अंमलदार म्हणून कार्यरत असलेले हवालदार संजय कराड हे आपले कर्तव्य सोडून दुपारी दोनच्या सुमारास काळेपडळ पोलीस ठाण्याच्या आवारात आले. मद्याच्या नशेत असलेल्या कराड यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि त्यांनी पोलीस ठाण्यातील बाकड्यावर बसलेल्या एका महिला तक्रारदाराला जोरदार धडक दिली. यात महिला जखमी झाली. शुद्धीवर नसलेल्या कराड यांनी त्यानंतरही तिथे असलेल्या लोकांशी हुज्जत घातली. वैद्यकीय अहवालात त्यांनी मद्यपान केल्याचे सिद्ध झाले आहे.

दरम्यान, या दोन्ही कर्मचाऱ्यांचे कृत्य 'महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांचे' उल्लंघन करणारे आणि पोलीस दलाची शिस्त पायदळी तुडवणारे आहे. या दोन्ही घटनांची गंभीर दखल घेत पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी दोन्ही हवालदारांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश दिले.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## उन्हाळ्यात अंजीर खाण्याचे आरोग्यवर्धक फायदे

उन्हाळा सुरू होताच आपल्या आहारात बदल करणे खूप आवश्यक असते. उन्हाळ्यात शरीरातील पाणी लवकर कमी होते. पचनक्रिया देखील संवेदनशील होते. ज्यामुळे पोटदुखीचा धोका वाढतो. बऱ्याचदा लोक उष्ण प्रकृतीचे पदार्थ, ज्यामध्ये सुकामेवा देखील समाविष्ट आहे. अनेकदा आपण सुकामेवा खाणे टाळतो. विशेषतः अंजीरबद्दल अनेकांना प्रश्न पडतो की उन्हाळ्यात अंजार खाणे फायदेशीर आहे का? अंजीर हे पोषक तत्वांनी समृद्ध असलेले एक सुकेफळ असून ते आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. तथापि, त्याच्या उष्ण स्वभावामुळे लोक उन्हाळ्यात ते खाणे टाळतात. मात्र उन्हाळ्यात अंजीर खावे कि नाहि किंवा उन्हाळ्यात अंजीर खाल्ल्याने कोणते फायदे होतात जाणुन घऊया.

अंजीर पोषक तत्वांचा खजिना आहेत. त्यांमध्ये फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. तसेच ते लोह, मॅग्नेशियम आणि कॅल्शियमचा देखील एक चांगला स्रोत आहेत. ते खाल्ल्याने केवळ पोट जास्त वेळ भरलेले राहत नाही, तर रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासही मदत होते. चला तर मग, उन्हाळ्यात अंजीरचे सेवन कसे करावे हे जाणून घेऊया.

उन्हाळ्यात अंजीर खाणे किती योग्य आहे? : अंजीरचा गुणधर्म उष्ण असला तरी, उन्हाळ्यात त्यांचे सेवन करणे फायदेशीर ठरते. हिवाळ्यात तुम्ही ते कच्चे खाऊ शकता, परंतु उन्हाळ्यात सेवन करण्यासाठी त्यांना रात्रभर पाण्यात भिजवल्याने अंजिराचा उष्ण स्वभाव बदलतो आणि शरीराला लाभ देतो.

**अंजीर खाण्याचे फायदे**

वजन नियंत्रित राहते : अंजीरचे सेवन केल्याने वजन नियंत्रणात लक्षणीय मदत होऊ शकते. त्यामध्ये चांगल्या प्रमाणात फायबर असते, ज्यामुळे पोट भरलेले राहते आणि खाण्याची तीव्र इच्छा नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

शरीरात ऊर्जा वाढवते : उन्हाळ्यात सुस्ती येणे सामान्य आहे. यामुळे तुम्हाला दिवसभर थकवा जाणवू शकतो. दररोज सकाळी भिजवलेले अंजीर खाल्ल्याने तुम्हाला दिवसभर ऊर्जा मिळू शकते. अंजीरमधील नैसर्गिक साखर, खनिजे आणि बी जीवनसत्त्वे त्वरित शरीराला ऊर्जा देण्यास मदत करतात.

त्वचेसाठीही फायदेशीर : अंजीर खाल्ल्याने त्वचेच्या अनेक समस्यांपासून आराम मिळू शकतो. अंजीरमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी व ई असतात, जे त्वचेसाठी आवश्यक पोषक घटक आहेत. ते खाल्ल्याने त्वचेला चमक येते, कोरडेपणा कमी होतो आणि सूर्यापासून होणाऱ्या हानीपासून त्वचेचे संरक्षण होते.

हृदयाचे आरोग्य सुधारते : अंजीरमध्ये पोटॅशियम, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी योगदान देतात. ते कोलेस्ट्रॉल कमी करतात आणि रक्तदाबही नियंत्रित ठेवतात.

# एक-दोन नव्हे तर ३५ गुन्ह्यांचा कुख्यात सराईत अखेर जेरबंद

## खेड पोलिसांची मोठी कामगिरी; तीन खुनांचे गुन्हे उघड

**खेड, ता. ९ :** पुणे ग्रामीण पोलिसांनी अत्यंत कौशल्यपूर्ण आणि धाडसी कारवाई करत ३५ गंभीर गुन्ह्यांचा रेकॉर्ड असलेल्या कुख्यात सराईत गुन्हेगाराला त्याच्या साथीदारासह अटक केली आहे. या कारवाईत केवळ एका खून प्रकरणाचा उलगडा झाला नाही, तर तब्बल तीन खुनांची मालिका उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. स्थानिक गुन्हे शाखा व खेड पोलीस पोलिसांच्या या संयुक्त कारवाईमुळे गुन्हेगारी जगतात मोठी खळबळ उडाली आहे.




सदर प्रकरणाची सुरुवात १८ मार्च २०२६ रोजी खेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाली होती. जैदवाडी परिसरातील एका दुर्गम मोकळ्या जागेत धनंजय मारुती घेवडे (वय ३३) यांचा मृतदेह आढळून आला होता. डोक्यावर व चेहऱ्यावर लोखंडी हत्याराने केलेल्या भीषण मारहाणीमुळे त्यांचा खून झाल्याचे स्पष्ट झाले. मयताच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपींविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनास्थळ अत्यंत दुर्गम असल्याने थेट पुरावे मिळणे कठीण होते. मात्र, पोलिसांनी हार न मानता तपासाची दिशा बदलली. घटनास्थळापासून मुख्य रस्त्यापर्यंतच्या परिसरातील तब्बल ११० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. सलग सहा दिवस १४५ किलोमीटरपर्यंतचा प्रवास ट्रॅक करत पोलिसांनी संशयितांचा माग काढला. या तपासातून ललित दिपक खोल्लम (रा. शिरोली, ता. खेड) आणि त्याचा साथीदार नंदलाल दिलीप होले (रा. कारेगाव, ता. आंबेगाव) हे संशयाच्या भोवऱ्यात सापडले.

गोपनीय माहितीच्या आधारे वडगाव निंबाळकर परिसरात सापळा रचण्यात आला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी उसाच्या शेतातून पळ काढून नदीकडे धावू लागले. मात्र, पोलिसांनी शिताफीने पाठलाग करत दोघांनाही नदीत उडी मारण्यापूर्वीच पकडले. चौकशीत आरोपींनी धक्कादायक खुलासे केले. धनंजय घेवडे यांच्यासोबत झालेल्या जुन्या वादातून ललित खोल्लम आणि नंदलाल होले यांनी संगनमताने लोखंडी रॉड व दगडाने मारहाण करून त्यांचा खून केल्याची कबुली दिली.

या कटात निलेश कैलास सणस याने आर्थिक मदत केल्याचे समोर आल्याने त्यालाही अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी खूनासाठी वापरलेले लोखंडी रॉड, दगड, तसेच आरोपींनी जाळून टाकलेल्या कपड्यांचे अवशेष आणि मयताचा मोबाईल फोन जप्त केला आहे. मोबाईल फोन विहिरीत फेकून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

तपासादरम्यान आणखी एक मोठा धक्कादायक खुलासा झाला. आरोपी ललित खोल्लम याने यापूर्वीही दोन खून केल्याची कबुली दिली. ठाणे येथे एका तरुणाचे अपहरण करून त्याचा खून केला, त्यानंतर त्याच्या आईलाही शिरोली येथे बोलावून निर्दयीपणे ठार मारल्याचे उघड झाले. या प्रकारामुळे पुणे ग्रामीण हद्दीतील दोन आणि ठाणे शहरातील एक असे एकूण तीन खुनांचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

ललित खोल्लम याच्यावर यापूर्वी खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी असे तब्बल ३५ गुन्हे दाखल आहेत. तसेच त्याच्यावर मोक्का कायद्यान्वयेही कारवाई झाली होती. आरोपी फरार असताना मध्यप्रदेशातून गावठी पिस्तुले आणून विक्री करत असल्याचेही तपासात समोर आले असून पोलिसांनी दोन पिस्तुले आणि काडतुसे जप्त केली आहेत. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व खेड पोलिसांच्या संयुक्त पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

## गुजरातने अवघ्या एक धावेने सामना जिंकला; बीसीसीआयने ठोठावला १२ लाखांचा दंड

**नवी दिल्ली, ता. ९ :** दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर शुभमन गिलच्या नतृत्वाखालील गुजरात टायन्सने दिल्ली कॅपिटल्सचा अवघ्या १ धावेने पराभव केला. शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या या सामन्यात गुजरातने अखेर बाजी मारली आणि हंगामातील पहिल्या विजयाची नोंद केली. एकीकडे पहिल्या विजयाचा आनंद साजरा होत असतानाचा कर्णधार शुभमन गिलला मोठा झटका बसला आहे. BCCI ने गिलला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.



गुजरातच्या तीन फलंदाजांनी झळकावलेली अर्धशतकेआणि रशीद खानची भेदक गोलंदाजी या जोरावर संघाने २१० धावांचा डोंगर उभा केला होता. दिल्लीकडून केएल राहुलने ९२ धावांची झुंजार खेळी केली, तर डेव्हिड मिलरने शेवटपर्यंत लढा दिला. दिल्लीविरुद्धच्या सामन्यात विहित वेळेत षटके पूर्ण न केल्यामुळे (स्लो ओव्हर रेट) गिलवर १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. आयपीएलच्या आचारसंहितेनुसार मोसमातील हा गुजरातचा पहिलाच गुन्हा असल्याने केवळ कर्णधाराला दंड झाला आहे. मात्र, हीच चूक पुन्हा झाल्यास गिलला २४ लाखांचा दंड भरावा लागेल आणि प्लेइंग इलेव्हन मधील इतर खेळाडूंनाही प्रत्येकी १२ लाखांचा दंड सोसावा लागेल. दिलासादायक बाब म्हणजे, तिसऱ्या चुकीनंतर कर्णधारावर बंदी घालण्याचा नियम आता हटवण्यात आला आहे.

या सामन्यात अष्टपैलू रशीद खान प्लेअर ऑफ द मॅचचा मानकरी ठरला. दिल्लीचा संघ सुसाट वेगाने विजयाकडे कूच करत असताना रशीदने आपल्या फिरकीच्या जाळ्यात दिल्लीच्या फलंदाजांना अडकवले. त्याने ४ षटकांत अवघ्या १७ धावा देत ३ महत्त्वाचे बळी टिपले. यामध्ये सलग दोन सामन्यात अर्धशतक ठोकणाऱ्या समीर रिझवीला त्याने शून्यावर बाद करत दिल्लीचे कंबरडे मोडले. रशीदच्या या अचूक गोलंदाजीमुळेच दिल्लीला विजयासाठी शेवटच्या चेंडूपर्यंत संघर्ष करावा लागला आणि अखेर त्यांना पराभव पत्करावा लागला.

## पुणे जिल्ह्यातील ७५४ ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेचा प्रारूप मसुदा तयार

**पुणे, ता. ९ :** जिल्हा परिषद निवडणुकीनंतर आता ग्रामपंचायत निवडणुकींच्या तयारीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून जिल्ह्यातील ७५४ ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेचा प्रारूप मसुदा तहसील पातळीवर जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांना १३ एप्रिलपर्यंत हरकती आणि सूचना देता येणार आहे. त्यानंतर नव्याने प्रारूप तयार करून ४ मे रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्ह्यात लवकरच ग्रामपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू होणार आहे.



राज्यातील जानेवारी ते डिसेंबर या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती आणि नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना तयार करण्यासाठी ग्रामविकास विभागाकडून कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली असून हे काम प्रामुख्याने तीन टप्प्यांत होणार आहे. ग्रामसेवकांनी प्रत्यक्षात गावांमध्ये जाऊन नव्याने हद्दी तयार केल्या आहेत. त्यात जिल्ह्यात ७५४ ग्राम पंचायतींचे प्रारूप आराखडे तहसील पातळीवर तयार करण्यात आले आहे. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रत्यक्ष पाहणीवर भर देण्यात आला.

## हर्षवर्धन सपकाळ यांची मोदी सरकारवर जोरदार टीका

**मुंबई, ता. ९ :** केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. मुंबईत युवक काँग्रेसच्या वतीने आयोजित न्याय सत्याग्रह आंदोलनात सहभागी होत त्यांनी विविध मुद्द्यांवर सरकारवर निशाणा साधला. या वेळी त्यांनी युवक काँग्रेसच्या कामाचे कौतुक करत त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.

सपकाळ यांनी सांगितले की, २०१४ साली मोठी आश्वासने देऊन सत्तेत आलेल्या केंद्र सरकारने रोजगार, शेती आणि विकासाच्या बाबतीत दिलेली वचने पूर्ण केली नाहीत. वर्षाला २ कोटी रोजगार देण्याचे आश्वासन दिले होते, मात्र प्रत्यक्षात बेरोजगारी वाढल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचे आश्वासनही पूर्ण झाले नसल्याचे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, देशातील शेतकरी, कामगार आणि तरुण वर्ग सध्या अडचणीत आहे. शेतीसाठी लागणारा खर्च वाढत असताना शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. यासोबतच परदेशी व्यापार करारांमुळेही शेतकऱ्यांवर परिणाम झाल्याचा दावा त्यांनी केला. राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी काही घटनांचा उल्लेख करत तपास आणि कारवाईबाबत प्रश्न उपस्थित केले. तसेच देशाच्या धोरणांवर बाहेरील दबाव असल्याचेही त्यांनी म्हटले. दरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली देशात संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी संघर्ष सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. अन्यायाविरोधात काँग्रेसचा लढा सुरूच राहील आणि सर्वांनी मिळून हा संघर्ष पुढे नेऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## रेणापूरजवळ भीषण अपघात, केजचे तहसीलदार राकेश गिड्डे ठार

**बीड, ता. ९ :** बीड जिल्ह्यातील केज येथील तहसीलदार राकेश गिड्डे यांचे गुरुवारी पहाटे लातूर जिल्ह्यातील रेणापूर जवळ झालेल्या एका भीषण रस्ते अपघातात दुर्दैवी निधन झाले. या घटनेमुळे महसूल विभागात आणि संपूर्ण जिल्ह्यात मोठी शोककळा पसरली आहे.






मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, तहसीलदार राकेश गिड्डे हे आपल्या खासगी वाहनाने प्रवास करत होते. रेणापूर परिसरात त्यांच्या कारचा भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की गाडीचा पार चक्काचूर झाला. या अपघातामध्ये राकेश गिड्डे गंभीर जखमी झाले होते. अपघातानंतर त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

सांगली जिल्ह्याचे सुपुत्र आणि केवळ ३१ वर्षांचे तरुण अधिकारी राकेश गिड्डे यांचे अकाली निधन ही अत्यंत धक्कादायक घटना आहे. सांगलीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्यांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून वयाच्या पंचविशीतच आपले यश सिद्ध केले होते.

माहूर आणि नांदेड येथे प्रशिक्षणार्थी तहसीलदार म्हणून त्यांनी आपल्या कामाची छाप पाडली, ज्याचे फलित म्हणून त्यांना केज (जि. बीड) येथे तहसीलदार म्हणून महत्त्वाची जबाबदारी मिळाली. एक तरुण अधिकारी प्रशासनात किती उत्कृष्ट काम करू शकतो, हे त्यांनी आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले होते. असा उमदा आणि ध्येयवादी अधिकारी आपल्यातून जाणे, ही कधीही न भरून निघणारी हानी आहे.

## प्रेमात अडथळा येत असल्याने आईकडून चिमुकल्याची हत्या

**पुणे,ता. ९ :** पुणे जिल्ह्यातील कुरुळी येथे एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. प्रेमसंबंधात अडथळा ठरत असल्याने आईने आपल्या ६ वर्षांच्या मुलाचा प्रियकराच्या मदतीने खून केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दक्षिण म्हाळुंगे पोलिसांनी आईला अटक केली असून प्रियकराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




बसरीन मेहबुब शेख (वय २७, रा. कुरुळी, ता. खेड) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. तर आवेज मेहबुब शेख (वय ६) असे मृत मुलाचे नाव आहे. या प्रकरणात राम विनायक कजेवाड (रा. कुरुळी, ता. खेड) याच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बसरीन शेख हिचे लग्न मेहबुब शेख याच्यासोबत झाले होते. त्यांना आवेज हा मुलगा होता. दरम्यान, बसरीन हिचे राम कजेवाड याच्यासोबत प्रेमसंबंध जुळले. त्यानंतर ती मुलाला घेऊन चार महिन्यांपूर्वी पुण्यात आली आणि काम करू लागली.

मात्र, या दोघांच्या नात्यात मुलगा अडथळा ठरत असल्याने त्यांनी त्याचा खून करण्याचा कट रचला. ४ एप्रिल रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास त्यांनी बाथरूममध्ये पाण्याच्या बादलीत मुलाचे डोके बुडवून धरले. तो बेशुद्ध झाल्यानंतर त्याचे डोके भिंतीवर आणि जमिनीवर आपटून त्याचा खून केला.

घटनेनंतर दोघांनी मृतदेह घेऊन बीड जिल्ह्यातील माहेरी जाऊन मुलाचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगितले. मात्र, मुलाच्या आजोबांना संशय आल्याने त्यांनी पोलिसांना माहिती दिली.

पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला असता जखमांमुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी चौकशी केली असता आरोपी महिलेने गुन्ह्याची कबुली दिली. हा गुन्हा पुण्यात घडल्याने प्रकरण पुण्यात वर्ग करण्यात आले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जायभाये करत आहेत.

## आजपासून टोल नाक्यावर रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही

### फास्टॅग, युपीआय नसेल तर पुढे जाता येणार नाही

**नवी दिल्ली, ता. ९ :** देशातील राष्ट्रीय महामार्ग आणि एक्सप्रेसवेवरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. १० एप्रिल २०२६ पासून टोल वसुलीच्या नियमांत मोठे बदल होणार आहेत. नवीन नियमांनुसार, आता टोल प्लाझावर रोख रक्कम पूर्णपणे बंद केली जाणार असून डिजिटल पेमेंट अनिवार्य करण्यात आले आहे.




आजपासून टोल नाक्यांवरील 'कॅश लेन' पूर्णपणे बंद केल्या जातील. जर एखाद्या वाहनधारकाकडे वैध फास्टॅग नसेल किंवा डिजिटल पेमेंटची सोय नसेल, तर त्याला टोल प्लाझावरून पुढे जाण्याची परवानगी दिली जाणार नाही. नवीन नियमांनुसार, अनेक महामार्गांवर 'ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट सिस्टम' लागू केली जात आहे.

यामुळे वाहन जेवढे अंतर कापेल, तेवढाच टोल कापला जाईल. टोल प्लाझावर थांबण्याची गरज आता उरणार नाही. जर एखाद्याने नियमांचे उल्लंघन करून टोल नाक्यावर गोंधळ घातला किंवा रोख रकमेचा आग्रह धरला, तर त्याच्यावर दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते. तसेच, अशा वाहनांना काळ्या यादीत टाकण्याचे अधिकारही प्राधिकरणाला देण्यात आले आहेत.

**वाहनधारकांसाठी सूचना**

प्रवासाला निघण्यापूर्वी आपल्या फास्टॅगमध्ये पुरेसा बॅलन्स असल्याची खात्री करा. जर तुमच्या वाहनावर अजूनही फास्टॅग नसेल, तर तो आजच लावून घ्या, अन्यथा आजपासून तुम्हाला प्रवासात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागू शकते.

## बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार; प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांची घोषणा

**बारामती, ता. ०९ :** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीमधून काँग्रेसने माघार घेतली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गुरुवारी दुपारी गांधी भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ही घोषणा केली. माघार घेतली असली तरी आमचा कुणालाही पाठिंबा नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी ५ तारखेला फोन केला होता. कालही आणि आजही त्यांनी फोन करून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची विनंती केली होती. छगन भुजबळ, धनंजय मुंडे यांच्यासह अजित पवार गटाच्या इतर नेत्यांनीही याबाबत माघारीची विनंती केली. सकाळी रोहित पवार यांनीही भेट घेत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची विनंती केली. अजित पवारांच्या अपघाताबाबत एफआयआर नोंदवा ही काँग्रेसची भूमिका योग्य असल्याचेही ते म्हणाले. पार्थ पवारांच्या विधानाबाबत त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली. सुप्रिया सुळे, शरद पवारांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. या नंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये चर्चा झाली आणि महाराष्ट्राची संस्कृती, सभ्यता म्हणून बारामती पोटनिवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले.



भाजपशी विरोध आमचा कायम स्वरुपाचा आहे. अजित पवार गटानेही भाजपच्या विखारी विचारांच्या पक्षासोबत राहू नये ही भूमिकाही आमची कायम आहे. अजित पवार यांच्यासारख्या नेत्याच्या अपघाताचा तपास योग्य पद्धतीने केला जात नाही. गुन्हे दाखल केले जात नाही. एफआयआरबाबत आम्ही पाठपुरावा करत राहू, असेही सपकाळ म्हणाले.

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून ४ मे रोजी निकाल जाहीर होईल. या जागेवर अजित पवार गटाकडून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर काँग्रेसनेही ही निवडणूक लढण्याचा निर्णय घेत आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. मात्र ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी राज्यातील नेत्यांचे प्रयत्न सुरू होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही तीन वेळा फोनवरून हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी संपर्क साधला होता. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी गुरुवारी सपकाळ यांची भेट घेत ही निवडणूक बिनविरोध करावी अशी विनंती केली होती. त्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनीही ट्विट करत काँग्रेसला साद घातली होती. तसेच अजित पवार गटाच्या काही आमदारांनीही सपकाळ यांची भेट घेतली होती. त्यानंतर काँग्रेसच्या राज्यातील नेत्यांनी दिल्लीत हायकमांडशी चर्चा केली आणि पोटनिवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला.